# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:08.05.2025** **वार:गुरुवार**

1. यापुढे आगळीक केल्यास सज्जड कारवाईचा भारताद्वारे पाकला इशारा
2. ऑपरेशन सिंदूरचं देशविदेशातून कौतुक, आज सर्वपक्षीय बैठकीत चर्चा.
3. तिरंदाजी विश्वचषक स्पर्धेत भारताच्या पुरुष आणि महिला संघांचा अंतिम फेरीत प्रवेश आणि
4. अभिनेता, दिग्दर्शक, नाट्यगुरू आणि नाट्य समीक्षक माधव वझे यांचं पुण्यात निधन

**सिंदूर-ब्रीफ**

पाकिस्ताननं यापुढे कोणतीही आगळीक केली, तर भारतीय सैन्य पूर्णपणे तयार असल्याचा सज्जड इशारा भारतानं दिला आहे. पहलगाम दहशतवादी हल्ल्याला प्रत्युत्तर देताना भारतीय लष्करानं मंगळवारी मध्यरात्रीनंतर 1 वाजून 5 मिनिटे ते दीड वाजण्याच्या दरम्यान ऑपरेशन सिंदूर अंतर्गत पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधील नऊ दहशतवादी स्थळांना लक्ष्य करण्यात आलं. याबाबत काल नवी दिल्ली इथं झालेल्या पत्रकार परिषदेत या कारवाईची माहिती देताना, भारतीय लष्कराच्या कर्नल सोफिया कुरेशी आणि भारतीय वायु दलाच्या विंग कमांडर व्योमिका सिंग यांनी सांगितलं की, पहलगाम दहशतवादी हल्ल्यातील पीडितांना न्याय देण्यासाठी ऑपरेशन सिंदूर राबविण्यात आलं. याबाबत अधिक माहिती देताना कर्नल सोफिया कुरेशी....

**सिंदूर बाईस अप्रैल को पहलगाम में हुए। विभक्त आतंकवादी हमले के शिकार मासूम नागरिकों व उनके परिवारों को न्याय देने के लिए लॉन्च किया गया था। इस कारवाई में नाइन टेररिस्ट कैंप्स को टारगेट किया गया। इन लक्ष्यों का चयन विश्वसनीय इंटेलिजेंस सूचनाओं के आधार पर हुआ ताकि आतंक गतिविधियों की रीड तोड़ी जा सके और ये खास ध्यान दिया गया की निर्दोष नागरिकों और सिविलियन इंस्टॉलेशन को नुकसान ना पहुँचे। पाकिस्तान में पिछले तीन दशकों से terror infrastructure का निर्माण हो रहा। इस इसमें recruitment, indoctrination centers training areas launch pad शामिल थे जो पाकिस्तान और पाक अधिकृत जम्मू कश्मीर POJK दोनों में फैले है।**

यावेळी परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री म्हणाले की, पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या तपासातून पाकिस्तानचे दहशतवाद्यांशी असलेले संबंध उघड झाले असून भारतावर आणखी हल्ले होऊ शकतात अशी माहिती भारताच्या गुप्तचर संस्थांनी दिली आहे. असे हल्ले निकरानं परतवून लावण्यात येतील असंही मिस्त्री यांनी सांगितलं.

**पहलगाम-प्रतिक्रीया**

सैन्यदलाच्या या कारवाईनंतर, आता भारताकडे वाकड्या नजरेनं पाहणाऱ्या दहशतवादी संघटना आणि त्यांचे समर्थक पुरेपूर बोध घेतील अशी प्रतिक्रिया मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. या कारवाईचं चित्रीकरण उपलब्ध असल्यानं आता कोणीही पुरावे मागणार नाही असं सांगताना ते म्हणाले....

**प्रिसीशन पद्धतिन एस्ट्राईक करून दहशत वाद्यांचे 9 अड्डे पुर्णपणे उध्वस्त करण्यात आलेले आहेत. आणि यावेळी ते उध्वस्त करतानाचे अड्डे उडवताना पूर्ण शुटींग केलेले असल्याने कोणाला पुरावा मागण्याचा स्कोप राहिलेला नाही. आणि मला अस वाटत की सर्व भारतीयांकरिता हा अभिमानाच असा हा दिवस आहे की आमच्या वर झालेला हल्ला हा भारत सहन नाही तर त्याचा भारत योग्य पद्धतिना बदला घेईल. तो आपण आज घेतलेला आहे. आणि मला असं**

**वाटत की ऑपरेशन सिंदूर हे नाव अतिशय बोलके आहे, त्यामुळे मला अस वाटत कि आपण पुन्हा एकदा भारतीय सैन्य दलाचे आणि भारताच्या पंतप्रधानांचे अभिनंदन करूयात.**

ऑपरेशन सिंदूरबाबत आंतरराष्ट्रीय घडामोडीचे अभ्यासक शैलेंद्र देवळाणकर....

**भारताने ज्या नऊ दहशतवाद्यांच्या प्रशिक्षण स्थळावरती हल्ले केलेले आहेत त्याच्या माध्यमातून प्रतिकात्मक संदेश हा पाकिस्तानला आणि पाकिस्तान पुरस्कृत दहशतवादी संघटनांना आहे. यापूर्वीच्या दोन्ही म्हणजे एअर स्ट्राईक, मध्ये आणि सर्जिकल स्ट्राईक मध्ये आपण पोक पर्यंत आपल्याला स्वतःला मर्यादित ठेवलं होतं. यावेळेला आपण अशे काही प्रशिक्षण तळ निवडलेले आहेत जे पाकिस्तानमध्ये आहेत. जसं पंजाब मधलं भावलपूरचं असेल त्यामुळे ज्याच्या माध्यमातून दहशतवादी आपलं दुष्कृत्य करून कुठेतरी लपले, तरी त्यांना पकडलं जाईल आणि त्यांना त्यांच्या कार्याची शिक्षा दिली जाईल हा एक कडक मेसेज हा या ठिकाणी मिळाला. त्याचप्रमाणे पाकिस्तानचं लष्कर आणि पाकिस्तानची आयएसआय कोणत्याही दहशतवादी संघटनांना प्रोटेक्शन देण्यासाठी सक्षम नाहीयेत हे देखील या माध्यमातून निघून आलेलं आहे, आणि त्यामुळे पाकिस्तानच्या लष्कराविरुद्ध देखील एक असंतोष हा पाकिस्तानी जनतेमध्ये आता दिसून येतो आहे. मला असं वाटतं की याच्या माध्यमातून भारताने आपलं लष्करी सामर्थ्य आपली सक्षमता सिद्ध केलेली आहे.**

पहलगाम इथल्या दहशतवादी हल्ल्यात मृत्यूमुखी पडलेल्या पुण्यातील संतोष जगदाळे यांच्या पत्नी प्रगती जगदाळे यांनी ऑपरेशन सिंदूरनंतर आकाशवाणीकडे आपल्या भावना व्यक्त केल्या.....

**पहलगाम च्या हल्ल्यानंतर माझ कुंकु पुसलं गेलं, त्या भ्याड दहशतवाद्यांनी माझ कुंकु पुसलं तिथे रक्ताच्या थारोळ्यात माझे मिस्टर संतोष जगदाळे पडले होते. ते शहीद झाले तिथे, आणि त्या नंतर आज पंधरा दिवसांनतर मोदी सरांनी ऑपरेशन सिंदूर हे जेव्हा नाव दिल तेव्हा त्यांना जाणीव झाली की आपल्या लेकीचं सिंदूर त्या भ्याड दहशतवाद्यांनी मिटवल. त्यामुळे त्यांना जाणीव राहणार आहे कि त्यांनी कोणाला मारले आहे, आणि नऊ ठिकाणी जो हल्ला केलेला आहे तो अतिशय योग्य आहे, तर आता हल्ला त्यांनी थांबवू नये सर्व दहशत वाद्यांची पाळंमुळं नष्ट करून एक एक दहशतवादी त्यांनी मारावा.**

पहलगाम दहशतवादी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेले पुण्यातील कौस्तुभ गणबोटे यांचा मुलगा कुणाल आपल्या भावना व्यक्त करताना म्हणाला...

**ग्रुप्स आहेत जे आतंकवादी हल्ला करतात तर त्यांना शोधून शोधून संपवलं पाहिजे. आणि परत त्यांनी भारताकड़े वाकडी नजर करून बघितले नाही पाहिजे ही आमची इच्छा आहे.**

**मोदी-सिंदूर**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ऑपरेशन सिंदूर यशस्वीरित्या पार पाडल्याबद्दल सशस्त्र दलांचे कौतुक केले. नवी दिल्ली इथं केंद्रीय मंत्रिमंडळाला या मोहिमेबद्दल माहिती देताना ते बोलते होते. मोदी यांनी कालच राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट घेवून त्यांना ऑपरेशन सिंदूरबाबत माहिती दिली. विविध देशांच्या राष्ट्रप्रमुखांनी भारताचं अभिनंदन करताना दहशतवादाविरुद्ध लढाईच समर्थन केलं आहे.

सशस्त्र दलांनी अचूकता, सावधगिरी दाखवून इतिहास रचला असून या कारवाईदरम्यान कोणत्याही सामान्य नागरिकांना त्रास होणार नाही याची काळजी घेतल्याचं संरक्षणमंत्री राजनाथसिंह यांनी सांगितलं.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी 'ऑपरेशन सिंदूर' यशस्वी करून दाखवल्याबद्दल सैन्य दलाचं आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शाह यांचं अभिनंदन केलं आहे.

देशाच्या सीमेपलिकडे जावून लष्करी कारवाई करण्यासाठी राजकीय इच्छाशक्ती दाखवल्याबद्दल उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा, संरक्षणमंत्री राजनाथसिंह यांचं अभिनंदन केलं आहे.

ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी पुण्यात पत्रकारांशी बोलताना पंतप्रधान नरेंद्र मोदीं यांचं कौतुक केलं. सरकार कोणतीही भूमिका घेत असताना राजकारण न आणता पूर्ण ताकदीनं सरकारच्या पाठिमागं उभं राहिलं पाहिजे असं आवाहन शरद पवार यांनी यावेळी केलं.

**<u>सराव</u>**

युद्धजन्य परिस्थितीत नागरिकांनी काय काळजी घ्यावी याची माहिती प्रात्यक्षिकासह देण्यासाठी राज्यात जिल्हा मुख्यालयांमध्ये काल सराव घेण्यात आला. पुण्यात विधानभवन, पुणे महानगरपालिका आणि वनाज कंपनी या ठिकाणी संयुक्त सराव करण्यात आला. यामध्ये राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल, अग्निशमन दल, पोलिस विभाग, आरोग्य विभागाच्या रुग्णवाहिका सहभागी झाले होते. याव्यतिरिक्त, मुळशी, तळेगाव नगर पंचायत आणि पिंपरी महापालिका या ठिकाणी संयुक्त सराव पार पडला.

**<u>क्रीडा</u>**

शांघाय इथं सुरू असलेल्या तिरंदाजी विश्वचषक स्पर्धेत भारताच्या पुरुष आणि महिला संघांनी अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. पुरुष संघानं उपांत्य फेरीत डेन्मार्कचा 232-231 असा तर महिलांनी ग्रेट ब्रिटनचा 232-230 असा पराभव केला. अंतिम फेरीत भारतीय पुरुष संघाचा सामना परवा 10 तारखेला मेक्सिकोशी होणार आहे.

**<u>वझे</u>**

अभिनेता, दिग्दर्शक, नाट्यगुरू आणि नाट्य समीक्षक माधव वझे यांचं काल सकाळी पुण्यात निधन झालं. ते 85 वर्षांचे होते. साने गुरुजी यांनी लिहिलेल्या श्यामची आई या कादंबरीवर आधारित आणि प्र के अत्रे यांनी दिग्दर्शित केलेल्या श्यामची आई या चित्रपटात माधव वझे यांनी 'श्याम' ची प्रमुख भूमिका रंगवली होती. हिंदी चित्रपट सृष्टीत देखील त्यांनी आपल्या अभिनयाची छाप पाडली होती. अनेक नाट्यकर्मींची व्यक्तिचित्रणं असलेलं रंगमुद्रा, श्यामची आई, आचार्य अत्रे आणि मी हे आठवणींवर आधारित पुस्तक, लहान मुलांसाठी नंदनवन, समांतर रंगभूमी - पल्याड- अल्याड अशी काही ग्रंथसंपदा वझे यांच्या नावावर आहे. वझे यांच्या रंगमुद्रा आणि प्रायोगिक रंगभूमी - तीन अंक या ग्रंथाला राज्य शासनाचा पुरस्कार मिळाला आहे. राज्य नाट्य स्पर्धेमध्ये उत्कृष्ट अभिनयासाठी त्यांना पदकं मिळाली होती. भारतीय आणि पाश्चात्य प्रथितयश नाटककारांच्या नाटकांच्या प्रयोगांचं दिग्दर्शन त्यांनी केलं होतं. आंतरराष्ट्रीय नाट्य समीक्षक संघाचे ते सभासद होते. संघाच्या देश-परदेशातील अधिवेशनांमध्ये वझे यांनी अनेक शोधनिबंधही सादर केले होते.

**<u>हवामान</u>**

मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि कोकणात तुरळक ठिकाणी जोराचे वारे, आणि वीजांसह हलका ते मध्यम पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. विदर्भात यासोबत गारपिटीचीही शक्यता आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.